17287-17301

जा.क्रं.उमा-१/कोवि/संमा/वेतन/१९
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर दिनांक- 30 JUL 2019

प्रति

१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग
२) अधिक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कोल्हापूर विभाग

विषय - उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविदयालयांची सन २०१८-१९ चे संच मान्यतेनुसार सन २०१९-२०२० मधील वेतन देयके स्वीकारणेबाबत.

संदर्भ १ मा.आयुक्त, शिक्षण यांचे पत्र क्रं.आका/संचमान्यता/आस्था-ब(१२२)/३२०१ दिनांक १०/९/२०१५

२ या कार्यालयाचे परित्रक दि.३१/७/२०१७ व दि.२१/७/२०१८

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास सूचित करणेत येते की, या विभागातील ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांची अनुदानितकडील सन २०१८-१९ ची संच मान्यता पूर्ण झालेली आहे त्या शाळांची/कनिष्ठ महाविदयालयांची सच मान्यता प्रती संबंधित शाळांकडे व वेतन पथकाकडे देणेत आलेल्या आहेत. संबंधित कनिष्ठ महाविदयालयाकडून संच मान्यतेची वेतन पथकाची प्रत प्राप्त करुन घेणेत आलेली असलेच त्यानुसार खालील सूचना विचारात घेवून त्यांची वेतन देयके पारित करणेत यावीत.

१) ज्या पूर्णवेळ/अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचा शालार्थ आयडी मंजूर झालेला असेल अशाच शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन देयक पारित करावयाचे आहे. याबाबत मा.शिक्षण संचालक व शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी. **शालार्थ आयडी नसलेल्या शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन काढता येणार नाही.**

२) सदर संच मान्यतेची प्रत व त्यासोबत मा.आयुक्त कार्यालयाकडून देणेत आलेल्या हमीपत्राची प्रत घेणेत यावी (गतवर्षीप्रमाणे) संबंधित शाळेतील पूर्णवेळ मान्यताप्राप्त शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन काढणेत यावे. **(वाढीव मंजूर पदावरील मान्यता दिलेल्या परंतू वेतनास तरतूद नसलेल्या शिक्षण सेवक/शिक्षकांचे वगळून)**

३) **शासन निर्णयानुसार दोन ठिकाणची अर्धवेळ मिळून एका ठिकाणी पूर्णवेळ पदावर मान्यता देणेत आलेल्या शिक्षण सेवक/शिक्षकांचे बाबत** संच मान्यता २०१८-१९ मध्ये दोन ठिकाणचे मिळून पूर्णवेळ मान्यता दिलेल्या कर्मचा-यांचे दोन्ही ठिकाणी संबंधित विषयाचे अर्धवेळ पदे संच मान्यतेनुसार असलेस अशा शिक्षकांचे पूर्वीप्रमाणे पूर्णवेळ मान्यता असलेल्या ठिकाणी वेतन काढणेत यावे. तथापी अशा दोन अर्धवेळ पदावरील शिक्षकास संस्थांतर्गत अन्यत्र बदलीने नियुक्ती देणेबाबतच्या सूचना संच मान्यतेमध्ये देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार संबंधित शाळा/संस्था यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनुसार अर्धवेळ मंजूर पदावर जे अर्धवेळ शिक्षक/अर्धवेळ शिक्षण सेवक वेतन घेतले आहे व त्यांना सन २०१९-२०२० साठी किमान ९ घडयाळी तास कार्यभार उपलब्ध आहे याची खात्री करुन अशा अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कार्यभाराबाबतचे प्राचार्य व संस्थेचे सेवासातत्याचे हमीपत्र वेतन पथकाकडे सादर करुन वेतन काढता येईल. अशा अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन देयक पारित करावे. **(काही न्यायालयीन प्रकरणे, उपलब्ध कार्यभार/पद यांचा विचार करता रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांचे क.म.वि.मधील अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांचे अर्धवेळ पदावरील वेतन काढता येणार नाही. सदर संस्थामधील अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन सन २०१९-२० च्या संच मान्यतेनंतर स्वतंत्र प्रस्ताव घेवून त्यांना वैयक्तिक मान्यता दिलेनंतर काढणेत यावे.)**

५) सन २०१८-१९ चे संच मान्यतेमध्ये मान्यता दिलेली नसेल अथवा अर्धवेळ शिक्षण सेवक मान्यता असेल व त्यानंतर वैयक्तिक आदेशाद्वारे अर्धवेळ वेतनश्रेणीत या कार्यालयाकडून मान्यता देणेत आली असल्यास

Scanned by CamScanner

अशा अर्धवेळ शिक्षकांचे अर्धवेळ वेतनश्रेणीतील शिक्षकाचे वेतन वरीलप्रमाणे कार्यभार व सेवासातत्याचे हमीपत्राचे आधारे काढता येईल. **यासाठी संबंधित शाळेच्या सन २०१८-१९ च्या संच मान्यतेमध्ये सदर विषयाचे अर्धवेळ पद कार्यभारानुसार मंजूर असणे व २०१९-२० साठी कार्यभार उपलब्ध असणे आवश्यक राहील.(रयत व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था वगळून)**

६) **सन २०१०-११ पर्यंतची प्रस्तावित पदे शा.नि.दि.२१/५/२०१४ व २६/११/२०१४ नुसार मंजूर झालेली असलेने "अर्धवेळ मधून पूर्णवेळ" प्रस्तावित पदे मंजूर झाली आहेत यामूळे अर्धवेळची पायाभूत पदे व्यपगत झालेली आहेत यामूळे अशा अर्धवेळ व्यपगत पदावरील वेतन काढता येणार नाही.** सदर पूर्णवेळ मंजूर पदावर नियुक्त कर्मचा-यांचे वैयक्तिक मान्यतेबाबतचेजे निर्णय होतील त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७) **या कार्यालयाकडून सदर वाढीव मंजूर पदावर जून २०१५ पूर्वी मान्यता देणेत आलेल्या ४४ पूर्णवेळ व ३१ अर्धवेळ कर्मचा-यांचे** वेतनास शासन पत्र दिनांक १८/३/२०१६ नुसार **" एप्रिल २०१५"**पासून वेतन अनुज्ञेय ठरवले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

८) सन २००३-०४ ते २०१०-११ पर्यंतच्या प्रस्तावित पदापैकी शासनाने आर्थिक तरतूद केलेल्याच पदांना वेतन आदा करण्यात यावे. त्या व्यतिरिक्त इतर वाढीव पदीच वेतन काढण्यात येऊ नये.

९) सन २०११-१२ ते २०१३-१४ या कालावधीतील प्रस्तावित पदे अदयाप मंजूर झालेली नसलेने सदर पूर्णवेळ प्रस्तावित पदापैकी जी अर्धवेळ पायाभूत पदे आहेत व त्यांना या कार्यालयाकडून सन २०१८-१९ चे संच मान्यता व वैयक्तिक मान्यतेद्वारे अर्धवेळ शिक्षक म्हणून मान्यता देणेत आलेली आहे अशा कर्मचा-यांचे **अर्धवेळचे वेतन** कार्यभार व सेवासातत्य याच्या हमीपत्राद्वारे काढता येईल.

१०) कोणत्याही परिस्थितीत शालार्थ आयडी मंजूर नसलेल्या तसेच अर्धवेळ कार्यभार निकषानुसार देय ठरत नसलेल्या, मान्यता नसलेल्या कर्मचा-याचे वेतन काढले जाणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा याबाबतची वैयक्तिकरित्या संबंधित प्राचार्य/मुख्याध्यापक यांना जबाबदार धरुन म.खा.शा.कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ व अन्य प्रचलित नियम व शासन निर्णयानुसार कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

११) अंशकालीन शिक्षकांची वेतन देयके सन २०१८-१९ च्या संच मान्यतमध्ये मान्यता दिलेले अथवा वैयक्तिक मान्यता दिलेल्या अंशकालीन शिक्षकांचे सन २०१८-१९ साठीचे वेतन काढणेत यावे. संबंधितांचे मान्यतेशिवाय वेतन देयके पारित करणेत येवू नयेत. सन २०१९-२० साठीचे अंशकालीन शिक्षकांचे वेतन त्यांचे सन २०१९-२० चे मान्यतेशिवाय काढता येणार नाही.

१२) सदरच्या सूचना सन २०१९-२० ची शिक्षक संचमान्यतेनुसार असून या कार्यालयाचे पुढील आदेश होईपर्यत सुरु राहतील.

१३) अर्धवेळ मान्यताप्राप्त शिक्षकांनी अर्धवेळ कडून पूर्णवेळ शिक्षक म्हणून मान्यता मिळणेसाठी मा.न्यायालयात कोर्टकेस दाखल केलेली असलेस सन २०१९-२० साठी अर्धवेळ बाबत संस्थेचेच सेवा सातत्य तपासूनच अर्धवेळचे वेतन आदा करणेत यावे.

( सु.मा.आवारी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

प्रत - माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

सर्व मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये, कोल्हापूर विभाग

२/- वरील सूचनेनुसार पूर्णवेळ/अर्धवेळ दरमहाचे वेतन देयकासोबत प्राचार्य/मुख्याध्यापक यांचे हमीपत्र सादर करुन पात्र पूर्णवेळ/अर्धवेळ शिक्षकांचे वेतन देयके सादर करावतीत. **शालार्थ आयडी मंजूर नसलेल्या पूर्णवेळ/अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांची वेतन देयके सादर करु नयेत.**

Scanned by CamScanner

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य,पुणे-१

२) मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे-१

प्रत - माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

३) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

४) सचिव, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण सस्था, कोल्हापूर

२/- उपरोक्त सूचनांचे अनुषंगाने या विभागातील आपल्या सर्व क.म.वि.ना आवश्यक त्या सूचना निर्गमित करावयात.

Scanned by CamScanner